**इचलकरंजी महानगरपालिका**

**गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालय**

**जाहीर प्रकटन**

इचलकरंजी महानगरपालिका गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकडे नवीन प्रकाशित व प्रसिद्ध असलेली पुस्तके खरेदीकामी अंदाजपत्रक तयार करणेस दरपत्रक/ कोटेशन मागविणेत येत आहे.(अंदाजे र. रु. ७०,०००/- ते ७५०००/-) दिनांक१०/११/२०२५ ते दिनांक१७/११/२०२५ अखेर पर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बारनिशी विभागात स्विकारणेत येईल. प्राप्त दरपत्रक/ कोटेशन दि. १८/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडणेत येईल. खरेदीकामी पुस्तकांची यादी गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. याबाबतची सर्व अटी व शर्ती नोटीस बोर्डावर व गुरुवर्य रविंद्रनाथ टागोर वाचनालयाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

Digitally signed by
Nandu Dhondu Paralkar
Date: 07-11-2025
18:04:44
(नंदू परळकर)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

---

**अटी व शर्ती -**

१) दरपत्रक/ कोटेशन साक्षांकित केलेले असावे.
२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
३) पॅन कार्ड सत्यप्रत असणे आवश्यक आहे.
४) काळ्या यादीत नसलेचे प्रमाणपत्र.
५) Form 1B (रु.500/- च्या स्टँपपेपरवर).
६) संबधीत कामानुसार अनुभव कागदपत्रे.
७) सदरची पुस्तके स्वखर्चाने इकडे पुरविणे.
८) सदरची पुस्तके खराब अथवा फाटलेल्या स्वरुपात आढळली तर ती तात्काळ बदलून देणेची जबाबदारी संबंधित मक्तेदार यांचेवर राहील.
९) सदरकामी विलंब झाल्यास प्रत्येक दिवसास रु.१००/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
१०) कामाची मुदत १० दिवसाची राहील.
११) सदरचे दरपत्रक/ कोटेशन व संबंधित कागदपत्रे बंद लिफाफ्यामधून बारनिशी विभागाकडे जमा करावीत.